शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे सायंदैनिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व पुरुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खाजगी वितरण)
विशेषांक ऑगस्ट २०२६

Website : www.bhidekul.in
Email : office@bhidekul.in

1 अंक : 29 कोल्हापूर ता. 27 ऑगस्ट 2026 किंमत 4 रुपये ※ पाने 4+4 Postal Reg. No. KLR 136/24-26 Posted in Kolhapur RMS RNI NO. : M-6 (1457)

**नोंदणी क्रमांक (ई) – २०१४०** वेबसाईट : www.bhidekul.in

## नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, मुंबई

सार्वजनिक न्यास नोंदणी क्र. (ई) – २०१४०

**पुणे कार्यालय :** द्वारा – ले.क. सुनिल वासुदेव भिडे
१४२६, सदाशिव पेठ, नील सदन ए – २०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११ ०३०.
मो. ९६२३०१७४४४

**मुंबई कार्यालय :** द्वारा सौ. संपदा भिडे
ए ५०३, श्रीसाई शारदा हौसिंग सोसायटी,
भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम)
मुंबई – ४०० ०२८. मो. ९८१९९ ५१३९१

## निवडणूक सूचना, कार्यक्रम व संक्षिप्त मार्गदर्शिका

**※ निवडणूक सूचना –**

वर्ष २०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीकरिता प्रतिष्ठानचे घटना कलम क्र. १०.१, ११.१ आणि २६.६ नुसार विश्वस्त कार्यकारी मंडळाच्या सर्व ११ जागांसाठी, घटना कलम क्रमांक २३.८ नुसार एक जागा महिला विश्वस्तासाठी राखीव आहे. रविवार, दिनांक २७ सप्टेंबर, २०२६, सकाळी ११ ते दुपारी १.०० या वेळेत, १४३६ बी, शुक्रवार पेठ, ओंकारस्वरूप सोसायटी, बी बिल्डिंग, पहिला मजला, फ्लॅट नं. ११५, मंडईजवळ, पुणे ४११ ००२ येथे निवडणूक घेण्यात येणार आहे.

**※ निवडणूक कार्यक्रम –**

१) दि. ८ सप्टेंबर, २०२६ आणि ९ सप्टेंबर, २०२६ ह्या दोन दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत विश्वस्त पदासाठी उमेदवारी अर्ज प्रत्येकी मूल्य रु. १०० रोख भरून प्रतिष्ठानच्या मुंबई आणि पुणे कार्यालयात मिळतील.

२) अनामत रक्कम रु. १,००० रोख भरून व पोचपावती घेऊन, त्याची नोंद उमेदवारी अर्जात करून ते दिनांक १३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत पुणे कार्यालयात स्वीकारले जातील.

३) उमेदवारांनी, उमेदवारी अर्ज, सूचक व अनुमोदकाचे नाव, स्वाक्षऱ्या व सभासद क्रमांकासह बिनचूक भरावे.

४) चुकीची किंवा अपूर्ण माहिती, खाडाखोड आढळल्यास तो उमेदवारी अर्ज रद्द होईल.

५) उमेदवारी अर्जाची छाननी करून निवडणूक अधिकारी, पात्र व अपात्र उमेदवारांना दिनांक १३ सप्टेंबर, २०२६ रोजी दुपारी १२.०० ते दुपारी २.०० या वेळेत, प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी द्वारे सूचना देतील. अर्ज छाननीच्या वेळी उमेदवार हजर राहू शकेल.

६) उमेदवारी अर्ज मागे घ्यायचा असल्यास दिनांक १९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत पुणे कार्यालयात उमेदवाराने उमेदवारी मागे घेतल्याचा लेखी अर्ज द्यावा.

दि. २३ ऑगस्ट २०२६

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या सभासदांची पंचवीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २–३० वाजता** १४३६/बी, शुक्रवार पेठ, ओंकार स्वरूप सोसायटी, बी–११५, पहिला मजला, मंडईजवळ, पुणे–४११००२. येथे बोलविण्यात आलेली आहे. सर्व सभासद भिडे कुलबंधू–भगिनी व माहेरवाशिणींनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती !

### सभेपुढील विषय

१) स्वागत व प्रास्ताविक

२) मागील २८ सप्टेंबर २०२५ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचन व मान्यता.

३) आर्थिक वर्ष २०२५–२६ च्या वार्षिक अहवालाला मान्यता.

४) ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या हिशोब पत्रकांना मान्यता

५) सन २०२६–२०२७ या सालासाठी वैधानिक हिशोब तपासनीस यांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

६) सन २०२६–२७ या सालासाठी अंदाजपत्रक सादर करणे व मान्यता.

७) सभासदांकडून आलेल्या सूचनांचा व पत्रांचा विचार करणे,

८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय.

**विशेष सूचना :** (१) ज्या सभासदांना काही सूचना, प्रस्ताव इत्यादी द्यावयाचे असतील अथवा माहिती पाहिजे असल्यास अथवा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी लेखी अर्ज सहसचिव ले. क. (नि.) सुनील भिडे, १४२६, सदाशिव पेठ, नील सदन, ए–२०१, पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे – ४११ ०३०. या पत्यावर दि. २१ सप्टेंबर २०२६ पर्यंत आणून द्यावेत अथवा पोस्टाने पाठवावेत, ऐनवेळी विचारलेले प्रश्न व सूचना यांची दखल अध्यक्षांच्या परवानगीशिवाय घेतली जाणार नाही.

(२) गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास तहकूब झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी वरील कामकाजासाठी अर्ध्या तासाने सुरू होईल आणि अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

**कार्यकारिणीच्या आदेशान्वये**
**दिलीप वासुदेव भिडे**
**सचिव, नित्यंदय गोत्रीय भिडे प्रतिष्ठान**

७) उमेदवारांची अंतिम यादी दिनांक २० सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत पुणे कार्यालयात तयार होईल.

८) आजीव सभासदांची यादी पुणे कार्यालयात उपलब्ध आहे. (किंमत रु. ३००)

९) निवडणुकीची वेळ संपल्यानंतर मतपेट्या सीलबंद करण्यात येतील. निवडणुकीचा निकाल त्याच दिवशी दुपारी २.३० वा. आयोजित प्रतिष्ठानच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत जाहीर करण्यात येईल.

१०) अनामत रक्कम जप्त झालेले उमेदवार वगळता अन्य उमेदवारांना, त्यांनी भरलेल्या अनामत रकमेचा धनादेश, पावती दाखवून दिनांक ४ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत पुणे कार्यालयातून घेऊन जाता येईल.

**※ संक्षिप्त निवडणूक मार्गदर्शिका –**

१) घटना कलम क्र. २३.९ आणि २३.१० नुसार दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी प्रतिष्ठानच्या पटावर असलेल्या सभासदांनाच विश्वस्त पदासाठी उमेदवारी अर्ज भरता येईल, तसेच सूचक किंवा अनुमोदक म्हणून सही करता येईल.

२) निवडणुकांचे नियम सर्वांनाच सारख्याच प्रमाणात बंधनकारक राहतील.

३) घटना कलम क्रमांक १२.८ नुसार सर्व वर्गातील सभासदांना मतदानाचा अधिकार आहे.

४) घटना कलम क्र. २३.१ नुसार निवडणुका गुप्त मतदान पद्धतीने होतील.

५) निवडणुकीच्या दिवशी हे सूचना पत्रक आणि कुठलेही सरकारी फोटो ओळखपत्र आणावे.

६) उमेदवाराने अवैध कृत्य केल्यास उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल व त्यांनी भरलेली अनामत रक्कम जप्त होईल.

७) निवडणुकीच्या दिवशी उमेदवार निवडणूक अधिकारी ठरवतील त्या जागेवर बसतील.

८) निवडणुकीच्या दिवशी उमेदवारास कुठल्याही प्रकारचा प्रचार करता येणार नाही.

९) ज्या उमेदवारास किमान मतसंख्या (शेवटच्या विजयी उमेदवाराच्या १०%) मिळणार नाही, अशा उमेदवारांची अनामत रक्कम जप्त केली जाईल.

१०) घटना कलम क्र. २३.३ नुसार जरूर पडल्यास ह्या अथवा पुढील निवडणुकीसाठी नियम करण्याचा अथवा बदलण्याचा अधिकार विश्वस्त कार्यकारी मंडळाकडे राहील.

११) घटना कलम क्र. २३.५ नुसार पटावर असलेल्या एकूण आजीव सभासद संख्येच्या किमान २०% मतदान झाल्यास ते मतदान मान्य करण्यात येईल. किमान २०% मतदान न झाल्यास, विश्वस्त कार्यकारी मंडळ पुढील पाच वर्षांसाठी नवीन विश्वस्तांच्या नियुक्तीबाबत निर्णय घेईल.

१२) घटना कलम क्र. २४.५ नुसार निवडणुकीबाबत निवडणूक अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक राहील.

**अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ९६५७५४१२६६**

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, मुंबई**

**निवडणूक वेळापत्रक –**

※ दिनांक – रविवार, २७ सप्टेंबर, २०२६

※ निवडणूक प्रक्रिया – सकाळी ११.०० ते दुपारी १.००

※ मतमोजणी – दुपारी २.०० ते २.३०

**वार्षिक सर्वसाधारण सभा – दुपारी २.३० ते ४**

चहापान – दुपारी ४ ते ४.३०

**(दिलीप वा. भिडे** — सचिव

**(चंद्रकांत शंकर भिडे)** — अध्यक्ष

# अध्यक्षांचे मनोगत

**भिडे कुल बंधू–भगिनी व माहेरवाशिणींना नमस्कार !**

घटनेतील तरतुदींनुसार दि. २७ सप्टेंबर, २०२६ (रविवार) रोजी भिडे प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणूक घेऊन त्यानुसार नवीन कार्यकारिणी अस्तित्वात येणार आहे. सर्व आजीव सभासदांना सस्नेह सूचना व कार्यक्रमपत्रिका सोबत देत आहे.

भिडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष स्व. शशिकुमार भिडे यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर माझी अध्यक्ष म्हणून एकमताने निवड होऊन एक वर्षाचा कार्यकाल पूर्ण झाला. सन २०२५ मध्ये प्रतिष्ठानने स्वतःची वास्तू खरेदी केली. सदर वास्तू भिडे मंडळींना पाहता यावी ह्या निमित्ताने आपण २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पुणे येथील प्रतिष्ठानच्या वास्तूमध्ये घेत आहोत.

दि. ९ व १० जानेवारी, २०२७ ह्या दोन दिवशी २२ वे भिडे कुल संमेलन अमनसारा, किहीम, (अलिबाग) येथे घेत आहोत तरी सर्वांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे ही आग्रहाची विनंती. संमेलनासंबंधी माहिती ऑक्टोबर २०२६ च्या 'आम्ही भिडे' अंकात, वेबसाईटवर तसेच निमंत्रणाद्वारे देऊन सूचित करण्यात येईल.

भिडे प्रतिष्ठानकडून संमेलन निमंत्रणे, सभा सूचना पोस्ट टपालाद्वारे वितरित केल्या जातात. परंतु प्रत्यक्षात टपाल पाठविल्यानंतर ते वेळेवर मिळेलच ह्याची खात्री देता येत नाही. मनुष्यबळ, आर्थिक खर्च, वेळ याचा विचार करता आणि जलदगतीने माहिती पोहोचविण्यासाठी डिजिटलमध्ये पत्रव्यवहार असणे ही काळाची गरज आहे. त्या दृष्टीने वार्षिक सभेमध्ये याचाही विचार एकमताने व्हावा असे मला वाटते. भिडे प्रतिष्ठान भिडे कुलाचे, भिड्यांसाठी व त्यांच्या हिताकरिता असल्यामुळे आपल्या सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.



अनेक भिडे मंडळी शैक्षणिक, वैद्यकीय इत्यादी देणगी देतात. त्यामध्ये परदेशी शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी सुद्धा आपण विनापरतफेड आर्थिक मदत करत आहोत. ह्या निधीमध्ये वृद्धी होण्यासाठी आपले सहकार्य वेळोवेळी मिळते आहे. एखादी संस्था आर्थिक व सामाजिकरित्या जतन करून त्याची वृद्धी करून ती आदर्श व पारदर्शकपणे चालविण्याचे काम हे कोणा एका व्यक्तीचे नसून सांघिक आहे. प्रतिष्ठानचे विश्वस्त, पदाधिकारी, हितचिंतक, सभासद यांच्या आशीर्वादामुळे प्रतिष्ठानला बळ मिळते. त्यामुळे मी वयाची ७५ वर्षे पूर्ण करून सुद्धा मला काम करण्यासाठी ऊर्जा मिळते आहे. गेली २५ वर्षे काही भिडे मंडळी अखंड निःस्वार्थीपणे प्रतिष्ठानचे कार्य करीत आहेत. सरतेशेवटी वयपरत्वे मर्यादा येतात. त्यामुळे नवीन व्यक्तींनी पुढे येऊन प्रतिष्ठानच्या कार्यात सक्रिय सहभागी व्हावे असे आवाहन करतो. सोबत हिशोब पत्रके, ताळेबंद, जोडलेला आहे. आपल्या सर्वांचे सहकार्य आजपावेतो आहेच आणि भविष्यातही ते मिळत राहील याची मला खात्री आहे.

**चंद्रकांत शंकर भिडे**, अध्यक्ष